# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर शहरातील नाईक तलाव पुनरुज्जिवन व सौदर्यीकरण प्रकल्प निरी
**{सा.आ.अभि.विभाग}** या संस्थेव्दारे राबविण्याकरीता मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक ५१०/वि.क्र. ४९८ [पेंच प्रकल्प कक्ष] दिनांक १८.०९.२०१९ ला मान्यता प्रदान केली होती. निरी या संस्थेकडुन सदर प्रकल्प राबविण्याबाबत नागपूर महानगरपालिकेने कार्यादेश क्र. NMC/PPC/EE(PPC)/223/2019 दि. 20.09.2019 दिला होता परंतू करारनाम्यातील अटी व स्टॅम्प पेपर बाबत मुद्दा उपस्थित झाल्याने करारनामा कार्यान्वित करण्यात आला नाही.

नागपूर महानगरपालिकेने नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाचा प्रस्ताव केन्द्र शासनाच्या अमृत २.० अंतर्गत मंजूरीस्तव सादर केला होता. शासन निर्णय क्र. अमृत – २०२२/प्र.क्र.२६८/नवि-३३ नगर विकास विभाग दि. २ नोव्हेंबर, २०२२ अन्वये रु. १२.९५ कोटीच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असल्याने नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाबाबत निरी या संस्थेचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत मा. आयुक्त यानी दि. २८.११.२०२२ च्या कार्यालयीन आदेशान्वये मंजूरी प्रदान केली आहे. नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पास शासनाच्या अमृत २.० प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केली असल्याने निरी या संस्थेस नाईक तलाव पुनरुज्जिवन व सौदर्यीकरण प्रकल्पाच्या कामाचा देण्यात आलेला कार्यादेश रद्द करण्याचा प्रश्न विचारात घेणे.
टीप :- सविस्तर टिपणी नस्तीमध्ये संलग्न आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 262/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 14/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (पर्यावरण), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील नाईक तलाव पुनरुज्जिवन व सौदर्यीकरण प्रकल्प निरी या संस्थेव्दारे राबविण्याकरीता मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक ५१०/वि.क्र. ४९८ [पेंच प्रकल्प कक्ष] दिनांक १८.०९.२०१९ ला मान्यता प्रदान केली होती. निरी या संस्थेकडुन सदर प्रकल्प राबविण्याबाबत नागपूर महानगरपालिकेने कार्यादेश क्र. NMC/PPC/EE(PPC)/223/2019 दि. 20.09.2019 दिला होता परंतू करारनाम्यातील अटी व स्टॅम्प पेपर बाबत मुद्दा उपस्थित झाल्याने करारनामा कार्यान्वित करण्यात आला नाही.

नागपूर महानगरपालिकेने नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाचा प्रस्ताव केन्द्र शासनाच्या अमृत २.० अंतर्गत मंजूरीस्तव सादर केला होता. शासन निर्णय क्र. अमृत – २०२२/प्र.क्र.२६८/नवि-३३ नगर विकास विभाग दि. २ नोव्हेंबर, २०२२ अन्वये रु. १२.९५ कोटीच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असल्याने नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाबाबत निरी या संस्थेचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत मा. आयुक्त यानी दि. २८.११.२०२२ च्या कार्यालयीन आदेशान्वये मंजूरी प्रदान केली आहे. नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पास शासनाच्या अमृत २.० प्रकल्पांतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केली असल्याने निरी या संस्थेस नाईक तलाव पुनरुज्जिवन व सौदर्यीकरण प्रकल्पाच्या कामाचा देण्यात आलेला कार्यादेश रद्द करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**